208

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ५[illegible]५५ (५५)

ग्रंथ नाम मनाचे श्लोक.

विषय मराठी काव्य.

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे
मना बोलणे नीच सोसीत जावे
स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे
मना सर्व लोकासि रे नीववावे

॥५॥

देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी
मना चंदनाचे परी त्वा झिजावे
परी अंतरी सज्जना नीववावे

॥६॥

नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे
अती स्वार्थबुधी नुरे पाप साचे
घडे भोगणे पाप ते कर्म खोटे
नहोता मनासारिखे दुःख मोठे

॥७॥

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

2

सदासर्वदाप्रीतिरामीधरावी
दुखाचीस्वयेसांडिजीवीकरावी
देहेदुःखतेसूखमानीतजावे॥
विवेकेसदासस्वरूपीभरावे॥

॥१०॥

जगीसर्वसूखीअसाकोणआहे
विचारेमनातूंचिशोधूनिपाहे॥
मनात्वांचिरेपूर्वसंचीतकेले॥
तयासारिखेभोगणेप्राप्तजाले

॥११॥

मनामानसीदुःखआणूनकोरे
मनासर्वथाशोकचिंतानकोरे।
विवेकेदेहेबुधिसोडूनिद्यावी
विदेहीपणेमुक्तिभोगीतजावी

॥१२॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(2A)



मनासांगपारावणाकायजाले
अकस्माततेराज्यसर्वैबुडाले
म्हणोनीकुडीकल्पनासांडिवेगी
बळेलागलाकाळहापाठिलागी
॥१३॥

जिवाकर्मयोगेजनीजन्मजाला
परीशेवटीकाळघेउनिगेला॥
महाथोरतेमृत्युपंथेचिगेले
असंख्याततेजन्मलेआणिमेले
॥१४॥

मनापाहातासत्यहेमृत्युभूमी
जिताबोलतीसर्वहीजीवमीमी
चिरंजीवहेसर्वहीमानिताती
अकस्मातसोडूनियासर्वजाती
॥१५॥

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

मरेयेकत्याचादुजाशोकवाहे ॥
अकस्माततोहीपुढेजालआहे
पुरेनाजनीलोभरेक्षोभत्याते ॥
ह्मणोनीजगीमागुतेजन्मघेते

॥१६॥

मनीमानवीव्यर्थचिंतावाहाते
अकस्मातहोणारहोउनिजाते
घडेभोगणेसर्वहीकर्मयोगे ॥
मतीमंदतेखेदमानीवियोगे ॥

॥१७॥

मनाराघवावीणआशानकोरे
मनामानवाचीनकोकीर्तितूरे
जयावर्णितीवेदशास्त्रेपुराणे ॥
तयावर्णितासर्वहीश्लाघ्यवाणे

॥१८॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मनासर्वथासत्यसांडूनकोरे ॥
मनासर्वथामिथ्यमांडूनकोरे
मनासत्यतेसत्यवाचेवदावे
मनामिथ्यतेमिथ्यसोडूनद्यावे
॥१९॥

बहूहिंपुटीहोइजेमायपोटी
नकोरेमनायातनातेचिभोटी
निरोधेपचेकोंडिलेगर्भवासी ॥
अधोमूखरेदुःखत्याबाळकासी
॥२०॥

मनावासनाचूकवीयेरझारा
मनाकामनासांडिरेद्रव्यदारा
मनायातनाथोररेगर्भवासी ॥
मनासज्जनाभेटवीराघवासी



" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(५)

मनासज्जनाहीतमाझेकरावे
रघूनायकादृढचित्तीधरावे॥
महाराजतोस्वामिवायूसुताचा
जनाउधरीनाथलोकत्रयाचा

॥२२॥

नबोलेमनाराघवावीणकाही
जनीवाउगेबोलतासूखनाही
घडीनेघडीकाळआयुष्यनेतो
देहांतीतुलाकोणसोडूपाहातो

॥२३॥

रघूनायकावीणवायाशिणावे
जनासारिखेव्यर्थकावोसणावे
सदासर्वदानामवाचेवसोदे॥
अहंतामनीपापिणीतेनसोदे



" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मनावीटमानूनकोबोलण्याचा
पुढेमागुतारामजोडेलकैंचा ॥
सुखाचीघडीलोटतासूखआहे
पुढेसर्वजायीलकाहीनराहे

॥२५॥

देहेरक्षणाकारणेयत्नकेला
परीशेवटींकाळघेऊनिगेला
करीरेमनाभक्तियाराघवाची
पुढेअंतरीसोडिचिंताभवाची

॥२६॥

भवाच्याभयेकायभीतोसिलंडी
धरीरेमनाधैर्यधाकासिसांडी
रघूनायकासारिखास्वामिशीरी
नुपेक्षीकदाकोपल्यादंडधारी ॥

॥२७॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(5)

दिनानाथहारामकोदंडधारी
पुढेदेखताकाळपोटीथरारी॥
मनावाक्यनेमस्तहेसत्यमानी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी

॥२९॥

पदीराघवाचेसदाब्रीदगाजे॥
बळेभक्तरीपूशिरीकांबिवाजे॥
पुरीवाहिलीसर्वजेणेविमानी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी

॥३०॥

समर्थाचियासेवकावक्रपाहे
असासर्वभूमंडळीकोणआहे
जयाचीलिळावर्णितीलोकतीनी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(5 A)

महासंकटीसोडिलेदेवजेणे ॥
प्रतापेबळेआगळासर्वगूणे ॥
जयातेस्मरेशैलजाशूळपाणी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी

॥३१॥

अहल्याशिळाराघवेमुक्तकेली
पदीलागतांदिव्यहोऊनिगेली ॥
जयावर्णितांशीणलीवेदवाणी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी

॥३२॥

वसेमेरुमंदारहेसृष्टिलीळा ॥
शशीसूर्यतारांगणेमेघमाळा
चिरंजीवकेलेजनीदासदोनी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी



" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(6)

उपेक्षाकदारामरूपीअसेना।
जिवामानवानिश्चयेतोवसेना।
शिरीभारवाहेनबोलेपुराणी।
नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥ ३४ ॥

सदासर्वदादेवसन्नीधआहे॥
कृपाळूपणेअल्पधारिष्टपाहे॥
सुखानंदआनंदकैवल्यदानी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी

॥ ३५ ॥

असेहोजयाअंतरीभावजैसा
वसेहोतयाअंतरीदेवतैसा॥
अनन्यासरक्षीतसेचापपाणी
नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥ ३६ ॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(6A)

सदाचक्रवाकाशिमार्तंडजैसा॥
उडीघालितोसंकटीस्वामितैसा॥
हरीभक्तिचाघावघालीनिशाणी॥
नुपेक्षीकदारामदासाभिमानी॥

॥३७॥

मनाप्रार्थनातूजलायेकआहे
रघूराजथक्कीतहोउनिराहे॥
अवज्ञाकदाहोयदर्थीनकीजे
मनासज्जनाराघवीवस्तिकीजे

॥३८॥

जयावर्णितीवेदशास्त्रेपुराणे
जयाचेनियोगेसमाधानबाणे
तयालागिहेसर्वचांचल्यदीजे
मनासज्जनाराघवीवस्तिकीजे॥

॥३९॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मनापाविजेसर्वहीसूखजेथे
अतीआदरेठेविजेलक्षतेथे
विवेकेकुडीकल्पनापालटीजे
मनासज्जनाराघवीवस्तिकीजे
॥४०॥

बहूहिंडतासौख्यहोणारनाही
शिणावेपरीनातुडेहीतकाही
विचारेबरेअंतराबोधवीजे
मनासज्जनाराघवीवस्तिकीजे
॥४१॥

बहूतापरीहेचिआताधरावे
रघूनायकाआपुलेसेकरावे
दिनानाथहेतोडरीब्रीदगाजे
मनासज्जनाराघवीवस्तिकीजे
॥४२॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai "

मनासज्जनायेकजीवीधरावे
जनीआपुलेहीततूवाकरावे
रघूनायकावीणबोलूनकोहो
सदामानसीहानिजध्यासराहो
॥४३॥
मनारेजनीमौन्यमुद्राधरावी
कथाआदरेराघवाचीकरावी
नसेरामतेधामसोडूनिद्यावे
सुखालागिआरण्यसेवीतजावे
॥४४॥
जयाचेनियोगेसमाधानभंगे
अहंताअकस्मातयेऊनिलागे
तयेसंगतीचीजनीकोणगोडी
जयेसंगतीनेमतीरामसोडी
॥४५॥

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(8)

मनाजेघडीराघवेंवीणगेली
जनीआपुलीतेतुवाहाणिकेली
रघूनाथकावीणतोशीणआहे॥
जनीदक्षतोलक्षलाउनिपाहे॥

॥४६॥

मनीलोचनीश्रीहरीतोचिपाहे
जनीजाणताभक्तहोउनिराहे
गुणीप्रीतिराखेक्रमूसाधनाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥४७॥

सदादेवकाजीझिजेदेहज्याचा
सदारामनामेवदेनित्यवाचा॥
स्वधर्मेचिचालेसदाउत्तमाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥४८॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

सदाबोलण्यासारिखेंचालताहे
अनेकीसदायेकदेवासिपाहे
सगूणीभजेलेशनाहीभ्रमाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥४९॥

नसेअंतरीकामकारीविकारी
उदासीनजोतापसीब्रह्मचारी
निवालामनीलेशनाहीतमाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥५०॥

मदेमछरेसांडिलीस्वार्थबुधी
प्रपंचीकनाहीजयालेउपाधी
सदाबोलणेनम्रवाचासुवाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥५१॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

क्रमीवेळजोतत्त्वचिंतानुवादे ॥
नलिंपेकदादंभवादेविवादे ॥
करीसूखसंवादजोऊगमाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा
॥५२॥

सदाआर्जवीप्रीयजोसर्वलोकी
सदासर्वदासत्यवादीविवेकी
नबोलेकदामिथ्यवाचात्रिवाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा
॥५३॥

सदासेविआरण्यतारुण्यकाळी
मिळेनाकदाकल्पनेचेनिमेळी ॥
चळेनामनीनिश्चयोदृढज्याचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥५४॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

9(A)

नसेमानसीनष्टआशादुराशा
वसेअंतरीप्रेमपाशापिपाशा
ऋणीदेवहाभक्तिभावेजयाचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥५५॥

दिनाचादयाळूमनीचामवाळू
स्नेहाळूकृपाळूजगीदासपाळू
तयाअंतरीक्रोधसंतापकैचा
जगीधन्यतोदाससर्वोत्तमाचा

॥५६॥

जगीहोयिजेधन्ययारामनामे
क्रियाभक्तिउपासनानित्यनेमे
उदासीनतातत्वतासारआहे॥
सदासर्वदामोकळीवृत्तिराहे

॥५७॥

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yaswantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(10)

नकोवासनावीषयीवृत्तिरूपे
पदार्थीजडेकामनापूर्वपापे॥
सदारामनिष्कामचिंतीतजावा।
मनाकल्पनालेशतोहीनसावा।

॥५८॥

मनाकल्पनाकल्पिताकल्पकोटी
नव्हेरेनव्हेसर्वथारामभेटी॥
मनीकल्पनारामनाहीजयाला
अतीआदरेप्रीतिनाहीतयाला

॥५९॥

मनारामकल्पतरूकामधेनू
निधीसारचिंतामणीकायवानू
जयाचेनियोगेघडेसर्वसत्ता॥
तयासाम्यताकायसीकोणआता।

॥६०॥

" Joint property of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(10A)



उभाकल्पवृक्षातळीदुःखवाहे
तयाअंतरीसर्वदातेचिराहे ॥
जनीसज्जनीवादहावाढवावा
पुन्हामागुतीशोकजीवीधरावा

॥ ६१ ॥

निजध्यासतोसर्वतूटोनिगेला
बळेंअंतरीशोकसंतापठेला ॥
सुखानंदआनंदभेदेबुडाला ॥
मनीनिश्चयोसर्वखेदेउडाला

॥ ६२ ॥

घरीकामधेनूपुढेताकमागे ॥
हरीबोधसांडूनवेवादलागे ॥
करीसारचिंतामणीकाचखंडे ॥
तयामागतादेतआहेउदंडे ॥ ७ ॥

॥ ६३ ॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

# मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com